


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. ०४ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# 'बिनविरोध पॅटर्न' विरोधात मनसे कोर्टात जाणार

## उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही, राज ठाकरेंनी व्यक्त केले आश्चर्य

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील 29 महापालिकांसाठी 15 जानेवारीला मतदान होणार असले तरी, अनेक प्रभागांमध्ये आतापासूनच विजयाचा उत्सव सुरू झाला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातील 70 जागी विरोधी उमेदवारांची माघार किंवा एकच उमेदवार रिंगणात उरल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. यामध्ये महायुतीचे, विशेषतः भाजपचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. या विचित्र राजकीय परिस्थितीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आश्चर्य व्यक्त करत, "उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही," असे विधान केले आहे.

ठाण्याचे शहराध्यक्ष अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, राज ठाकरेंनी महानगरपालिकेतील बिनविरोध विजयावरुन वक्तव्य केले. माझ्या उभ्या आयुष्यात अशी निवडणूक कधी मी पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण अशी निवडणूक जी



इतक्या उमेदवारांना बिनविरोध करते. ही परिस्थिती पहिल्यांदाच मी पाहतोय, असे राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, या 'बिनविरोध पॅटर्न' विरोधात मनसे सोमवारी न्यायालयात धाव घेणार आहे. "उमेदवार कोट्यवधी रुपयांना विकत घेतले असून कोपरीतील आमच्या महिला उमेदवाराला ५ कोटींची ऑफर देण्यात आली," असा खळबळजनक आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी पुराव्यांसह केला आहे. राज ठाकरेंची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

"कोपरी भागातील मनसेच्या महिला उमेदवाराला पमनानी नावाच्या व्यक्तीने मध्यरात्री जवळपास ३० ते ४० वेळा फोन केले. त्यांना मुलुंड येथे जबरदस्ती भेटायला बोलावलं होतं. उमेदवारी मागे घेण्याकरता त्यांना पाच कोटीची ऑफरही देऊ केले. हवं तर तिथलं सीसीटीव्ही फुटेज चेक करा", असंही अविनाश जाधव म्हणाले.

### आतापर्यंत 70 नगरसेवक बिनविरोध विजयी

बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांमध्ये भारतीय जनता पक्षाने मोठी आघाडी घेतली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही जोरदार मुसंडी मारली आहे. आतापर्यंत भाजपचे 44 नगरसेवक बिनविरोधी निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे गटाच्या 22 उमेदवारांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे 2, इस्लाम पार्टीचा 1 (मालेगाव) आणि अपक्ष 1 असे एकूण 70 नगरसेवक महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडून आले आहेत.

# २ लाखांपर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ : शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने बँकेकडून पीक कर्ज घेताना लागणारे तारण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय 1 जानेवारी 2026 पासून लागू होणार आहे. त्याचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे यासंबंधीचे अधिकृत राजपत्रही जारी झाले आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी या निर्णयाची घोषणा करत शेतकऱ्यांना गुड न्यूज दिली. ते म्हणाले, दोन लाख रुपयांपर्यंतच्या सर्व शेती व पीक कर्ज व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क 1 जानेवारी 2026 पासून पूर्णतः माफ करण्यात येणार आहे. या निर्णयाबाबतचा अधिकृत आदेश महसूल व वन विभागाकडून जारी करण्यात आला आहे. शेती हा अत्यंत जोखमीचा व्यवसाय आहे. वातावरणात होणाऱ्या सतत बदलांचा शेतीवर थेट परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. या परिस्थितीत पीक कर्ज हेच शेतऱ्यांसाठी उपयुक्त ठरते. पण कर्ज घेताना होणारा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवत होता. हे लक्षात घेऊन सरकारने मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 9 च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात



आलेल्या अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे खात्री पट असल्याचे हा निर्णय घेण्यात आला. दुसरीकडे, कृषी तज्ज्ञांनी सरकारच्या या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे. शेतीसाठी आवश्यक बियाणे, खते, औषधी, यंत्रसामग्री आदींसाठी शेतकऱ्यांना अधिक भांडवलाची गरज असते. मुद्रांक शुल्क माफ झाल्याने कर्जाचा संपूर्ण फायदा प्रत्यक्ष शेतीकामासाठी वापरता येणार आहे, असे ते म्हणालेत. विशेष म्हणजे राज्य सरकारने यापूर्वी देखील सर्वच प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी जोडावे लागणारे 500 रुपयांचे मुद्रांक शुल्कही माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांनाही फायदा झाला होता. या निर्णयाचा लाभ राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, तसेच ग्रामीण बँकांमार्फत घेण्यात येणाऱ्या शेती व पीक कर्ज व्यवहारांना मिळणार आहे.









# संजय कोठारी 'मानव सेवा' पुरस्काराने सन्मानित

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जैन सांस्कृतिक कला फाउंडेशन, नाशिक व श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली (महाराष्ट्र प्रांत) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा देशपातळीवरील 'मानव सेवा' पुरस्कार जामखेड येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना देण्यात आला आहे.

दि ३१डिसेंबर रोजी जैन सांस्कृतिक कला महोत्सव नाशिक तसेच जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोनचे महाराष्ट्र प्रांतीय अध्यक्ष मोहनलाल लोढा व कांतीलाल चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था गेल्या २१ वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहे. पुरस्कार निवड समितीने संजय कोठारी यांच्या मानव सेवेतील भरीव योगदानाची दखल



घेत त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे होते. नाशिक जिल्हा जैन सांस्कृतिक कला फाउंडेशन गेल्या २१ वर्षांपासून जैन समाजातील युवक-युवती व बालकांसाठी धार्मिक व वैचारिक चर्चासत्रांचे आयोजन करीत आहे. दरवर्षी ३१ डिसेंबर रोजी अनावश्यक खर्च टाळून साधु-संतांच्या विचारांवर आधारित कार्यक्रम घेतले जातात. मध्यरात्री १२:०५ वाजता २०२६ नवीन वर्षाच्या स्वागतासाठी परमपूज्य स्वर सम्राज्ञी मधुस्मिताजी महासतीजी यांच्या मांगलिकांने कार्यक्रम पार पडला

या कार्यक्रमात भरत नागदा जैन. राजस्थान यांना करुणा रत्न पुरस्कार, नंदकुमार भटेवरा कोल्हार यांना समाज भूषण पुरस्कार संजय कोठारी जामखेड यांना मानव सेवा पुरस्कार मिठालाल कांकरिया छत्रपती संभाजीनगर यांना जीवन गौरव पुरस्कार मधुसूदन गांधी डोंबिवली यांना समाज रत्न पुरस्कार महेंद्रजी बोरा वणी यांना शिक्षा सहकार सेवा पुरस्कार डॉक्टर सुप्रिया गुगळे यांना महिला आरोग्य सेवा पुरस्कार असे एकूण सात पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिकचे उद्योगपती आशिष भंसाळी होते. यावेळी बोलताना सी.ए. हेमराज खाबिया म्हणाले संजय कोठारी जैन कॉन्फरन्स आणि कोठारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजोपयोगी व नव्या पिढीला प्रेरणादायी असे कार्य केले आहे.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,समर्थ अभियांत्रिकी चे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,बी सी एस चे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर,प्रा.शिवाजी कुमकर,डॉ.शरद पारखे, रा से यो अधिकारी प्रा.दिनेश जाधव,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र



आत्मसात करून त्याप्रमाणे जीवनाची मूल्ये आचरणात आणावी असे यावेळी प्रा.राजीव सावंत म्हणाले. वल्लभ शेळके म्हणाले की,शिक्षणाविषयी अपार प्रेम,एक थोर समाजसुधारक,ज्योतिबांच्या सहचारिणी,एक उत्तम गृहिणी,कवयित्री,लेखिका,वक्तृत्व व भाषण कला अशा प्रकारचे सर्वगुणसंपन्न आणि अष्टपैलू महिला व्यक्तिमत्व म्हणून सावित्रीबाईंकडे पाहिले जाते.ज्या काळात स्त्रीला समाजात मनाचे स्थान मिळत नव्हते शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र ठेवले जात होते त्या काळात सावित्रीबाईचा जन्म झाला.पुढे मात्र सावित्रीबाईना,ज्योतिबा फुले यांचा उदार दृष्टीकोन असल्याने स्वतःचे व्यक्तिमत्व घडविण्याची संधी प्राप्त झाली.त्या काळात महिलेला चूल आणि मूल,उंबरठा हीच लक्ष्मण रेषा किंवा मर्यादा अशी परिस्थिती होती.मुलगी जर शिकली नाही तर प्रगती होणार नाही व काळाची पावले ओळखून स्त्री सक्षम व सबळ होण्यासाठी पुण्यात सर्वप्रथम १४ जानेवारी १९४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरू केली.

सावित्रीबाई फुले यांचे चरित्र समाजासाठी दिशादर्शक व प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांनी व्यक्त केले.आज पुणे विद्यापीठाने देखील सावित्रीबाईंचे कर्तृत्व आणि शिक्षण क्षेत्रातील कार्याचा गौरव करत विद्यापीठाचे नाव सावित्रीबाई फुले विद्यापीठ असे केले आहे.

# श्रीक्षेत्र मोहटादेवी गड येथे शांकभरी नवरात्रोत्सवाची सांगता

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान येथे शांकभरी नवरात्रोत्सवाची सांगता पारंपारिक उत्साहात व वेदमंत्राच्या जयघोषात झाली. राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविकांनी दिवसभरात भेट देवून श्री मोहटादेवीचे दर्शन घेतले. सप्तशती पाठांची पुर्णाहुती होमहवनाने झाली.

देवस्थानचे विश्वस्त ॲड. श्री कल्याण बडे, सौ. संगीता बडे, श्री श्रीकांत लाहोटी, सौ. कावेरी लाहोटी यांच्या हस्ते होमहवन महापुजा करून वेदमंत्राच्या जयघोषाने परिसर दुमदमला.

देवस्थानमार्फत वासंतिक, शारदीय व शांकभरी अशी तीन नवरात्रे साजरी होतात. शांकभरी नवरात्रोत्सवामध्ये रोज पारंपारिक उत्सव, त्रिकाल आरत्या, सुवासिनी पूजन, अन्नदान, शाकाहार महात्म्य व उपयोगिता याबाबतचे वर्णन देवी महात्म्य



मध्ये सांगून शांकभरी पौर्णिमेशी त्याचा संबंध आहे, शांकभरी पौर्णिमेला गावोगावच्या सुवासिनी विविध प्रकारच्या पालेभाज्या व पुरणपोळीच्या महानैवेद्य देवीला आणतात. नवसाची पुर्ती झाली, म्हणुन सवाष्णी जेवु घालण्याची परंपरा आहे. पौराणिक कथेनुसार, पृथ्वीवर जेव्हा भीषण दुष्काळ पडला होता, तेव्हा देवी भगवतीने 'शाकंभरी' अवतार घेतला होता. तिने आपल्या शरीरातून विविध प्रकारच्या भाज्या, फळे आणि धान्य उत्पन्न करून जगाचे पोषण केले होते. या दिवशी आपण निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. अन्नाची कमतरता भासू नये म्हणून देवीची प्रार्थना केली जाते.

सकल भारतवासीय देवीभक्तांचे उत्तम आरोग्य व धनधान्य, सुख समृध्दी प्राप्त व्हावी, जणमाणंसामध्ये ऐक्य, प्रेम भाव निर्माण व्हावा, असा संकल्प करुन देवीस प्रार्थना करण्यात आली.

# महिलांना सन्मानाची वागणूक देणे कर्तव्य

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नवचेतना अभियानाच्या माध्यमातून समाजातील एकल महिलांना व पुरुषांना सन्मानाने पुन्हा संसाराची संधी मिळावी, या उदात्त उद्देशाने जिल्हा परिषद नाशिक यांच्यावतीने पुनर्विवाह करू इच्छिणाऱ्या एकल महिला व पुरुषांचा मोफत, सर्व जातीय, राज्यस्तरीय पुनर्विवाह वधु-वर परिचय मेळावा दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी श्री कृष्ण गार्डन व मंगल कार्यालय, विल्होळी ता. जि. नाशिक येथे उत्साहात पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी आजही अनेक एकल महिला सामाजिक उपेक्षा, भीती आणि असुरक्षिततेत जीवन जगत आहेत.

# जामखेड तहसीलमध्ये राष्ट्रीय ग्राहक दिनाचा कागदपत्री देखावा

**जामखेड तालुका: (समर्थ गांवकरी)**

तहसीलदार साहेब.. पुवडा अधिकारी गैरहजर... नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा झालेचा देखावा करण्यात आला आहे..

विशेष म्हणजे. हा ग्राहक दिन ज्या ग्राहकांसाठी साजरा केला जातो. तेच कोणी उपस्थित नव्हते... अजब प्रकारे ग्राहक दिन साजरा करण्यात आला आहे... शहरातील व तालुक्यातीलबहुतांशी पत्रकारांना या दिनाचे निमंत्रण दिले गेले नाही. स्वयम सेवी संस्था प्रतिनिधी.. समाज सेवकांना.. सजग नागरिकांना.

जागृत ग्राहकांना या दिनाचे निमंत्रण न देण्याचे कारण काय? तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना निमंत्रण दिले गेले होते. ते योग्यच आहे. परंतु



ज्यांच्या साठी हा ग्राहक दिन शासना मार्फत साजरा केला जातो तेच या कार्यक्रमासाठी आलेले दिसत नाहीत...

दिं. 24 डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन व दि. 15 मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा केला जातो..

जामखेड मधे दि. २४ डिसेंबर ला ग्राहक दिन साजरा केला असे म्हणने धाडसाचे ठरेल..

कारण या दिवसी तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार उपस्थित होते. बाकी कोणी नव्हते..

कडी म्हणजे या सभेत दुकानदारांचे दोन गट पडले.. मुळ विषय बाजूला झाला. दोन गटांत शाब्दिक चकमक झालयाचे खात्रीलायक वृत्त आहे... पुरवठा विभागाने खरेतर या सभेचे नियोजन केले पाहिजे होते.. संबंधित अधिकारी.. दुकानदारांना. सजग नागरिकांना.. जागृत ग्राहकांना व पत्रकारांना निमंत्रण का. दिले गेले नाही? हामोठा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे..

ग्राहक दिन साजरा करण्याचे कारण आहे की.. ग्राहकांच्या काय अडचणी आहेत. काही सुचना आहेत. दुकानदाराच्या काही अडचण आहेत. त्याच्या काही सुचना आहेत. याचा उहापोह या सभेत केला पाहिजे.. ग्राहक व दुकानदारांमधे विचार विनिमय व्हावा म्हणून हा ग्राहक दिन साजरा केला जातो.. परंतु जामखेड मधे ग्राहक दिनाच्या नावाखाली वेगळाच प्रकार झाला आहे.. हे उचित नाही.

# तपन कुमार मिश्रा यांचा गौरवपूर्ण सेवा निवृत्ती सत्कार

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

सरस्वती शिक्षण संस्थेच्या सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयातील हिंदी विषयाचे ज्येष्ठ व अनुभवी प्राध्यापक तपन कुमार मिश्रा यांच्या सेवा निवृत्तीनिमित्त संस्थेच्या सर्व संकुलांच्या वतीने भव्य व भावपूर्ण सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार होते.

यावेळी संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानिवार, सहसचिव नरसिंगराव पिसारिवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, मुख्याध्यापिका वीणा सिरमनवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रा. तपन कुमार मिश्रा व त्यांच्या पत्नी सौ. श्रुतीमधू मिश्रा यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला.





या प्रसंगी हरगेंद्र पाठक व सौ. कांचन पाठक, तसेच श्रीमती शोभादेवी हे परिवारातील सदस्य उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी प्रा. मिश्रा यांच्या दीर्घ शैक्षणिक कारकिर्दीचा गौरव करताना त्यांच्या अध्यापन कौशल्याचा, हिंदी भाषा व साहित्याच्या प्रचार-प्रसारासाठी केलेल्या कार्याचा तसेच सांस्कृतिक व सामाजिक योगदानाचा विशेष उल्लेख केला.

समारंभास बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण पाईकराव, मांडवा येथील मुख्याध्यापक नरसिंगराव नेम्मानिवार, माजी मुख्याध्यापक मुकुंद तिरमनवार, सुनील पाठक, प्रो. डॉ. विजय उपलंचवार, प्रा. रेणुकादास पहूरकर, संजय चव्हाण यांच्यासह सर्व विभागप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. सुनील व्यवहारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले तर डॉ. किरण आयनेनवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रो. डॉ. संदीप पाईकराव, डॉ. सुनील जाधव, डॉ. माधव जोशी यांनी ब्लॉगच्या माध्यमातून प्रा. मिश्रा यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सरस्वती शिक्षण संस्थेच्या सरस्वती संकुलातील सर्व शाखांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण सन्मान, कृतज्ञता व भावनांनी भारलेले होते.



# उज्वला सावंत यांचे निधन

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

चिंचोली येथील उज्वला श्रीरंग सावंत यांचे मंगळवारी ( दि. ३० ) वयाच्या ६९ व्या वर्षी अकस्मात निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, डॉ. मुलगी, डॉ. मुलगा, डॉ. सून, नातवंड, पुतणे, दीर, भावजय असा परिवार आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सेवानिवृत्त कार्यालयीन अधीक्षक श्रीरंग सावंत यांच्या त्या पत्नी होत्या.

# क्रांतीज्योती सावित्री फुले जयंती उत्साहात





**पाथर्डी: (समर्थ गांवकरी)**

दि. ३ जानेवारी रोजी प्रवरा माध्यमिक विद्यालय भुतेटाकळी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माता पालक संघाचे सदस्या आशा शिरसाट, सखी सावित्री समितीच्या सदस्या शेख रुबाब, गोडगे पद्मावती यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन झाले व मुख्याध्यापकांनी आलेल्या महिला पाहुण्यांचा सत्कार केला.

याप्रसंगी विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून उत्कृष्टपणे भाषणे सादर केली. प्रास्ताविक बाळासाहेब फुंदे, समारोप अशोक भगत आणि सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रतिनिधी सपना शिरसाट व सुवर्णा केदार यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात विद्यालयाचे मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अफाट कार्याच्या प्रेरणामुळे महिला किती सक्षम आणि शक्तिशाली झाल्या याची अनेक उदाहरणे दिली आणि मुलींना महिलांना सावित्रीबाई फुले या नेहमीच प्रेरणादायी ठरणार असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी संभाजी फुंदे,गोडगे बंडोपंत,टाकळकर अजिनाथ, खुडे लक्ष्मण, सांबारे धनंजय,फुंदे वाल्मीक, फुंदे रामकिसन, खेडकर अशोक उपस्थित होते.

# धनगर समाज बांधवाच्या वतीने जरांगे पाटील यांचा सत्कार



**सिन्नर : (समर्थ गांवकरी)**

धनगर समाजाच्या वतीने संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील व छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर यांचा घोंगडी काठी देऊन पांगरी येथे छावा भारत क्रांती मिशनच्या वर्धापन दिन कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. यावेळी धनगर समाजाचे नेते कोपरगाव तालुका माजी सभापती वाल्मीक आप्पा कोळपे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब नाना कोळपे,छावा संघटना सिन्नर तालुका अध्यक्षनिवृत्तीभाऊ बबनराव मुरडणार, परमेश्वर नलावडे पाटील,अण्णासाहेब खाडे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# निरंकारी सतगुरूंचा आनंद व आशीर्वादांनी परिपूर्ण पावन संदेश!

## निरंकाराच्या रजेमध्ये जीवन जगणे हीच खरी साधना – निरंकारी सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज!

**दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

संत निरंकारी मिशन (रजि.)च्या वतीने नववर्षाच्या शुभप्रसंगी दिल्लीतील ग्राउंड क्रमांक ८, निरंकारी चौक, बुराडी रोड येथे भव्य विशेष सत्संग समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या पावन सत्संगात माता सुदीक्षा जी महाराज यांनी उपस्थित श्रद्धाळूंना नववर्षाचा आध्यात्मिक संदेश दिला.

"निरंकार प्रभूच्या इच्छेमध्ये जीवन जगणे हीच खरी साधना आहे," असे प्रेरणादायी उद्गार सतगुरू माता जी यांनी यावेळी काढले. या सत्संगात दिल्ली, एन.सी.आर. तसेच देशातील विविध राज्यांतून हजारो श्रद्धाळूंनी सहभाग घेतला. नववर्षाच्या



पहिल्याच दिवशी सतगुरू माता जी व निरंकारी राजपिता जी यांच्या पावन सान्निध्यात दिव्य दर्शन व प्रवचनांचा लाभ घेऊन भक्तांनी आत्मिक शांती व आध्यात्मिक ऊर्जेचा अनुभव घेतला.

सतगुरू माता जी यांनी आपल्या उद्बोधनात सांगितले की, नववर्षाचा पहिला दिवस हा संतांच्या वचनांचे श्रवण करून ते जीवनात आत्मसात करण्याची सुवर्णसंधी देतो. जिथे सामान्य समाज नववर्षाची सुरुवात मौजमजेने करतो, तिथे संत सत्य, सत्संग आणि सेवेमार्ग स्वीकारतात. सत्संगातून सुरू झालेले जीवन प्रत्येक क्षणी निरंकाराच्या अनुभूतीला अधिक दृढ करत जाते.

त्या पुढे म्हणाल्या की, तार्किक दृष्टीने पाहता नववर्ष म्हणजे पृथ्वीने सूर्याभोवती केलेली एक प्रदक्षिणा व ऋतूंचा बदल आहे. आपण शुभेच्छा देतो, नवे संकल्प घेतो; परंतु खरे परिवर्तन तेव्हाच घडते, जेव्हा ते अंतःकरणातून होते. संत आत्ममंथनाच्या माध्यमातून सकारात्मक परिवर्तन घडवून आणतात आणि निरंकाराला सर्वोच्च मानून सेवा, सुमिरन व सत्संग यांना जीवनात अग्रक्रम देतात.

प्रत्येक भक्ताची हीच भावना असते की प्रत्येक नवे वर्ष त्याला अधिक दृढतेने सेवा, सिमरण व सत्संगाशी जोडून ठेवावे आणि त्याचबरोबर सांसारिक जबाबदाऱ्याही पूर्ण निष्ठेने पार पाडता याव्यात. जेव्हा शब्दांपेक्षा कृती प्रभावी ठरते आणि जीवनच संदेश बनते, तेव्हाच खरी साधना प्रकट होते, असेही त्या म्हणाल्या.

भूतकाळ व भविष्य हे मायेचे स्वरूप असून, वर्तमान क्षणात निरंकाराच्या अनुभूतीत जगणे हेच खरे जीवन आहे. "कालही ईश्वराचीच इच्छा होती आणि आजही त्याचीच कृपा आहे," हा विश्वास दृढ झाला की चिंता दूर होते आणि जीवन सहज व संतुलित बनते.

हे नववर्ष केवळ तारखेतील बदल नसून प्रेम, गोडवा, सौम्यता आणि समजूत स्वीकारण्याची संधी आहे. मनमुटाव व द्वेष दूर ठेवून, इतरांच्या भावना समजून घेणे, दोषांवर पडदा टाकून गुण स्वीकारणे हीच खरी भक्ती असल्याचे सतगुरू माता जी यांनी अधोरेखित केले. प्रत्येक श्वासात प्रभूचे स्मरण आणि प्रत्येक क्षणी हृदयात निरंकाराचा निवास असावा, हाच नववर्षाचा खरा संदेश आहे. नववर्षाच्या निमित्ताने सतगुरू माता जी यांनी शेवटी सर्व श्रद्धाळूंना सुख, समृद्धी व आनंदमय जीवनाच्या हार्दिक शुभेच्छा प्रदान केल्या.

# स्वाभिमानी, निःस्वार्थ आणि सर्वसामान्यांचा आधारस्तंभ

## माजी खासदार सदाशिव लोखंडे साहेबांचा प्रेरणादायी जीवनप्रवास : जाहिरातबाजीपासून दूर राहून विकासाचे भरीव काम करणारे, संघर्षातून घडलेले नेतृत्व!

(समर्थ गांवकरी)

■ शब्दांकन ■
इंजि. बाजीराव पा. दराडे
माजी जिल्हा परिषद सदस्य



अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेले आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जनतेच्या सेवेसाठी आयुष्य वाहून घेतलेले माजी खासदार सदाशिव लोखंडे साहेब यांचा जीवनप्रवास खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे. चेंबूर येथे वास्तव्यास असताना त्यांचे बालपण व तरुणपण हलाखीच्या परिस्थितीत गेले. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने लहान वयातच त्यांनी कष्टाला सुरुवात केली. सकाळी लवकर उठून परिसरात वर्तमानपत्रे टाकण्याचे काम ते प्रामाणिकपणे करत असत. गरिबी, संघर्ष आणि अपमानाची झळ त्यांनी जवळून अनुभवली; मात्र या परिस्थितीने त्यांना कधीच खचवले नाही.

या संघर्षातूनच समाजातील गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी काहीतरी करण्याची जाणीव त्यांच्या मनात रुजली. याच भावनेतून त्यांनी अल्पवयात संघटनेची वाट धरली. संघाच्या संस्कारातून शिस्त, प्रामाणिकपणा, त्याग आणि राष्ट्रभक्तीची शिकवण त्यांनी आत्मसात केली. सामाजिक जाणीव अधिक तीव्र होत गेली आणि राजकारण हे समाजकारणाचे प्रभावी माध्यम आहे, हा विश्वास त्यांच्या मनात पक्का झाला.

राजकीय प्रवासात मात्र सुरुवातीला त्यांना सातत्याने अपयशाचा सामना करावा लागला. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक असो, कर्जत-जामखेड विधानसभा निवडणूक असो किंवा जिल्हा परिषद निवडणूक, प्रत्येक ठिकाणी पराभव त्यांच्या वाट्याला आला. मात्र या अपयशांनी त्यांना खचवले नाही; उलट अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा दिली. "अपयश हीच यशाची पहिली पायरी असते," हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले.

अथक परिश्रम, तळागाळातील जनतेशी थेट संवाद आणि निस्वार्थ सेवाभावाच्या जोरावर कर्जत-जामखेड मतदारसंघातून ते सलग तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर शिर्डी लोकसभा मतदारसंघातून दोन वेळा खासदार म्हणून निवडून येत त्यांनी मतदारसंघाचे प्रभावी प्रतिनिधित्व केले. संसदेत असो वा मतदारसंघात, त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांचे प्रश्न प्राधान्याने मांडले.

पद असो वा नसो, सदाशिव लोखंडे साहेबांनी स्वतःची ओळख कधीही बदलली नाही. आजही ते सर्वसामान्य माणसाप्रमाणे लोकांमध्ये मिसळतात, त्यांच्या अडचणी ऐकतात आणि शक्य तितक्या लवकर मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. प्रामाणिक कार्यकर्त्यावर अन्याय झाला, तर न्याय मिळेपर्यंत त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून ते ओळखले जातात. राजकारणाच्या पलीकडे जाऊन माणुसकीचे नाते जपणारे, साधी राहणीमान आणि उच्च विचारसरणी असलेले लोखंडे साहेब हे सर्वसामान्यांचे खरे कैवारी आहेत.

दिल्लीमध्ये एखाद्या सामान्य व्यक्तीचे काम असो, साहेब भेटले की आपुलकीने विचारपूस, चहापाणी, जेवणाची चौकशी आणि काम पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा, ही त्यांची कार्यपद्धती आजही तशीच आहे. निस्वार्थपणे अनेक ज्वलंत प्रश्न त्यांनी केंद्र सरकारच्या पातळीवर मांडले. निळवंडे धरणाचे कालवे, पंचतारांकित एमआयडीसीचा प्रश्न, घाटमाथ्याचे पाणी वळवण्याचा मुद्दा अशा महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी थेट देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत प्रभावी पाठपुरावा केला.

निळवंडे प्रकल्पातील मुख्य कालव्यांचे पाणी काही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने, सब-ब्रँचेसद्वारे पाईपलाईनने पाणीपुरवठा व्हावा यासाठी विशेष तरतूद मिळवून देण्यात साहेबांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शासनाकडून मंजुरी मिळाली आणि त्याचा थेट फायदा शेतकरी वर्गाला झाला.

अकोले तालुक्याच्या पर्यटन विकासासाठीही त्यांनी भरीव योगदान दिले. भंडारदरा रिंग रोडसाठी ९५ कोटी रुपये, म्हैसवळण–देवठाण रस्त्यासाठी ७० कोटी रुपये, चिंचखांड–शरणखेल रस्त्यासाठी २० कोटी रुपये, अशा प्रकारे ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी प्रमुख रस्त्यांसाठी मंजूर करून कामे सुरू करण्यात आली. विशेष बाब म्हणजे या विकासकामांचे कधीही श्रेय न घेता, जाहिरातबाजी न करता शांतपणे काम करण्याचा स्वभाव साहेबांना सर्वसामान्यांच्या मनात वेगळे स्थान मिळवून देतो.

स्वाभिमानी जीवनशैली हा सदाशिव लोखंडे साहेबांचा सर्वात ठळक गुण आहे. कोणत्याही मोठ्या शक्तीपुढे न झुकता, पदासाठी किंवा सत्तेसाठी तडजोड न करणे, ही शिकवण ते कार्यकर्त्यांना देतात. "निवडणुका किंवा मतांसाठी माझा स्वाभिमान गहाण ठेवणार नाही," हा ठाम विचार त्यांनी नेहमीच कृतीतून दाखवून दिला आहे. संघाच्या संस्कारात घडलेले हे नेतृत्व सत्तेसाठी किंवा पैशासाठी कधीही तडजोड करणार नाही, तर स्वाभिमानाने संघर्ष करेल, हा विश्वास त्यांनी कायम जपला आहे.

जे स्वाभिमानी विचारधारेने चालतील, त्यांनाच सोबत घेऊन विकासाचे काम केले जाईल, हुकूमशाही व लाचारशाहीविरोधात सातत्याने संघर्ष केला जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. तडजोडीचे राजकारण नको असल्यास राजकारणातून थांबून समाजकारण करण्याचीही त्यांची तयारी आहे, हेच त्यांच्या प्रामाणिकपणाचे द्योतक आहे.

अशा संघर्षातून घडलेल्या, निःस्वार्थ, स्वाभिमानी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी अखंड झटणारे माजी खासदार सदाशिव लोखंडे साहेबांना त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांचा जीवनप्रवास आजच्या तरुण पिढीसाठी निश्चितच दिशादर्शक आणि प्रेरणादायी आहे.

• • •

## काशिराम तांडा शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



कंधार : (समर्थ गांवकरी)

कंधार तालुक्यातील फुलवळ सर्कल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काशिराम तांडा येथे ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्त्री शिक्षणाच्या जननीला अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर हे होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना मुख्याध्यापक चव्हाण सर म्हणाले की, "सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्यामुळेच आज महिला सर्व क्षेत्रात प्रगती करत आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आपले भविष्य घडवावे." याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषणे सादर केली. काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक यरमवार सर  शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी,पो.पाटील, अंगणवाडी ताई आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## ८ लाखांहून अधिक साईभक्तांचे दर्शन

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने नाताळ सुट्टी, सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिर्डी महोत्सवाच्या कालावधीत (दि. २५ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६) सुमारे ८ लाखांहून अधिक साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. या कालावधीत संस्थानला विविध माध्यमांतून एकूण २३ कोटी २९ लाख २३ हजार ३७३ रुपये इतकी देणगी प्राप्त झाल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.) यांनी दिली. याशिवाय, २९३.९१० ग्रॅम सोने (अंदाजे किंमत ३६ लाख ३८ हजार ६१० रुपये) ५ किलो ९८३ ग्रॅम चांदी (अंदाजे किंमत ९ लाख ४९ हजार ७४१ रुपये) अशी देणगी प्राप्त झाली आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी श्री साईबाबांच्या चरणी ६५५ ग्रॅम वजनाचा, आकर्षक नक्षीकाम असलेला सुवर्ण-हिरे जडीत मुकुट अर्पण करण्यात आला.

## शेतात राज्यपालांनी तिफनवर केली ज्वारीची पेरणी!





दिंडोरी तालुका : (समर्थ गांवकरी)

दिंडोरी तालुक्यातील खोरीपाडा येथील आदर्श शेतकरी सम्राट राऊत यांच्यासाठी आजचा दिवस अत्यंत आनंदाचा व अविस्मरणीय ठरला. आचार्य देवव्रत यांनी राऊत यांच्या शेताला अचानक भेट देत शेतकरी कुटुंबाला सुखद धक्का दिला. यावेळी राज्यपालांनी स्वतः तिफनवर ज्वारीची पेरणी करून शेती व शेतकरी यांच्याविषयीची आपली आत्मीयता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिली. राज्यपालांनी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधत नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. "मी स्वतः शेतकरी असून देशी गायींच्या साहाय्याने संपूर्णपणे नैसर्गिक शेती करतो. ही शेती लाभदायी व पर्यावरणपूरक आहे," असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना प्रेरणा दिली. राज्यपालांच्या या भेटीमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसून येत होता. यावेळी राऊत कुटुंबाने नैसर्गिक शेतीतून पिकविलेल्या विविध उत्पादनांची अनोखी भेट देत राज्यपालांचा सत्कार केला. तसेच ही भेट स्मरणीय ठरावी म्हणून आदिवासी बांधवांचे पारंपरिक वाद्य पावरीही त्यांना सप्रेम भेट देण्यात आली. कार्यक्रमाला भास्कर भगरे, डॉ. प्रवीण गेडाम, प्रशांत नारनवरे, आयुष प्रसाद, ओमकार पवार, रवींद्र माने तसेच दिपक झिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

राऊत कुटुंबाने खास ग्रामीण चवीची नागलीची पेज व तांदळाचे धिरडे तयार करून राज्यपालांचे आदरातिथ्य केले. श्री. देवव्रत यांनी या पदार्थांचा आनंदाने आस्वाद घेत समाधान व्यक्त केले. कौटुंबिक स्नेहाचा परिचय देत त्यांनी कुटुंबातील सदस्यांची प्रेमाने विचारपूस केली. यावेळी त्यांनी जनावरांच्या गोठ्याची पाहणी केली, शेताच्या बांधावर वृक्षारोपण केले तसेच पशुसंवर्धन विभागाने उभारलेल्या स्टॉललाही भेट दिली.

पारंपरिक आदिवासी संस्कृतीनुसार करण्यात आलेले औक्षण व स्वागत राज्यपालांनी मोकळेपणाने स्वीकारले. तसेच श्री. राऊत यांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी मनापासून कौतुक केले, ज्यामुळे राऊत कुटुंबीय विशेष सुखावले.

या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासकीय शिस्त, स्वच्छ प्रतिमा आणि विकासाभिमुख नेतृत्वाचा गौरव!

## जनसेवेचा कर्मयोगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने विशेष लेख!

(समर्थ गांवकरी)

■ लेखन ■
डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून



शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांचा वाढदिवस आज संपूर्ण मतदारसंघात उत्साहात साजरा होत आहे. प्रशासनातील कठोर शिस्त, राजकारणातील संयम आणि जनतेच्या प्रश्नांप्रती असलेली आस्था यामुळे भाऊसाहेब वाकचौरे हे नाव शिर्डी मतदारसंघात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी शुभेच्छांचा वर्षाव होत असून, सामाजिक उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा केला जात आहे.

**प्रशासकीय सेवेतून लोकप्रतिनिधी पदापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास :** ४ जानेवारी १९५० रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात जन्मलेल्या भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिक्षणाची भक्कम पायाभरणी करत पदवी (B.A.) आणि कायद्याचे शिक्षण (L.L.B.) पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी अकोले खरेदी विक्री संघ पहिली सेवा दिली, त्यानंतर एम.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण होऊन नेवासा येथे गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत झाले, तिथून पुढे पदोन्नती होऊन अहिल्यानगर जिल्ह्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदापर्यंत पोहोचले व एक सक्षम व कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली.

विशेषतः श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून त्यांनी केलेले काम आजही आदर्श मानले जाते. भाविकांना केंद्रस्थानी ठेवून राबवलेली पारदर्शक व्यवस्था, सुव्यवस्थित दर्शन प्रणाली आणि विकासाभिमुख निर्णयांमुळे साई संस्थानच्या कारभारात आमूलाग्र बदल घडून आला. याच काळात त्यांची लोकप्रियता प्रशासनाच्या चौकटीबाहेर जाऊन जनसामान्यांपर्यंत पोहोचली.

**संसदेत प्रवेश आणि लोकहिताचे ठाम मुद्दे :** २००९ साली भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेनेच्या तिकिटावर शिर्डी लोकसभा मतदारसंघातून पहिल्यांदा खासदार म्हणून निवडणूक जिंकली. संसदेत त्यांनी ग्रामीण भागातील पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, कांदा उत्पादकांचे हाल, तसेच शिर्डीसारख्या आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधांबाबत सातत्याने आवाज उठवला.

कांदा निर्यातबंदी, हमीभाव आणि शेतमालाला योग्य दर या मुद्द्यांवर त्यांनी संसदेत आक्रमक भूमिका घेतली. यामुळे उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये ते 'आपला माणूस' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**राजकीय चढ-उतार आणि २०२४ चे दमदार पुनरागमन :** राजकीय प्रवासात काही चढ-उतार आले. काही काळ त्यांनी काँग्रेस व भाजपमध्येही काम केले; मात्र त्यांनी कधीही जनतेशी असलेला संवाद तुटू दिला नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करून त्यांनी शिर्डी मतदारसंघातून पुन्हा एकदा खासदार म्हणून विजय मिळवला.

या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांचा पराभव करत त्यांनी मोठे मताधिक्य मिळवले. शेतकरी प्रश्न, पाणी योजना आणि स्थानिक विकासावर दिलेला भर हा त्यांच्या विजयाचा कणा ठरला.

**शिर्डी मतदारसंघाच्या विकासासाठी ठोस कामगिरी :** खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या कामाचा केंद्रबिंदू म्हणजे मतदारसंघाचा सर्वांगीण विकास.

निलवंडे धरणाच्या कालव्यांची कामे पूर्ण करून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचवण्यावर भर.

शिर्डी येथे येणाऱ्या लाखो भाविकांसाठी सुविधा वाढाव्यात यासाठी प्रसाद योजनेअंतर्गत निधी मिळवण्याचा पाठपुरावा.

शिर्डी विमानतळाचा विस्तार, नाईट लँडिंग व कार्गो सुविधा सुरू करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न.

नगर–मनमाड रस्ता व राष्ट्रीय महामार्गांच्या दुरुस्ती व विस्तारीकरणासाठी केंद्राकडे पाठपुरावा.

"ज्या गावात विकास केला नाही, तिथे मत मागणार नाही" – भाऊसाहेब वाकचौरे यांची स्पष्ट भूमिका!

"ज्या गावात मी विकासकामे केली नाहीत, त्या गावात कधीही मला मतदान करा, असे सांगणार नाही," अशी स्पष्ट आणि प्रामाणिक भूमिका मांडणारे शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे हे आज जनतेत 'आपला माणूस' म्हणून ओळखले जातात. राजकारणात केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामाला महत्त्व देणारी ही भूमिका त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य ठरली आहे.

भाऊसाहेब वाकचौरे यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत मतदारसंघातील गावोगावी ठोस विकासकामांचा ठसा उमटवला आहे. प्रत्येक गावात सभामंडप, अंतर्गत रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना, सामाजिक व धार्मिक स्थळांचा विकास, तसेच मूलभूत सुविधांची उभारणी त्यांनी प्राधान्याने केली. त्यामुळे अनेक गावांमध्ये आजही "हे काम वाकचौरे साहेबांनी करून दिले" अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जाते.

विशेष म्हणजे त्यांनी कधीही केवळ निवडणुकीपुरते गावांचे स्मरण केले नाही. ज्या गावात विकासकामे दिली, तिथेच ते अभिमानाने जनतेसमोर उभे राहिले. "काम केले असेल तरच मत मागायचे" हा त्यांचा स्पष्ट निकष असल्याने नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळेच शिर्डी, कोपरगाव, अकोलेसह संपूर्ण मतदारसंघात त्यांची ओळख नेता म्हणून नव्हे, तर घरचा माणूस म्हणून झाली आहे.

ग्रामस्थांच्या मते, सभामंडपांसारख्या सार्वजनिक सुविधा केवळ इमारती नसून त्या गावच्या सामाजिक जीवनाचे केंद्र बनल्या आहेत.

विवाह समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामसभा, विविध सामाजिक उपक्रम यासाठी या सभामंडपांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. ग्रामीण भागातील ही गरज ओळखून वाकचौरे यांनी दिलेले हे योगदान दीर्घकालीन ठरत असल्याचे चित्र आहे.

प्रशासकीय अनुभवाच्या जोरावर विकासकामांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार व्हावी, यावर त्यांनी नेहमीच भर दिला. त्यामुळे अनेक गावांमध्ये रखडलेली कामे मार्गी लागली. लोकसहभागातून विकास घडवून आणण्याची त्यांची पद्धत ग्रामस्थांना भावली आहे.

याच प्रामाणिकपणा आणि कामगिरीमुळे "भाऊसाहेब वाकचौरे म्हणजे आपला माणूस" ही भावना मतदारसंघात रुजली आहे.

राजकारणात शब्दांपेक्षा कामाला महत्त्व देणारा नेता म्हणून त्यांची ओळख आज अधिक ठळक होताना दिसत आहे.

### वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शिर्डी, कोपरगाव, अकोले सह संपूर्ण मतदारसंघात कार्यकर्ते, नागरिक, शेतकरी आणि विविध सामाजिक संस्थांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, अन्नदान यांसारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. प्रशासकीय शिस्त, राजकीय संयम आणि जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले लोकप्रतिनिधी म्हणून खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेच्या पुढील यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.

### संयमी नेतृत्व आणि स्वच्छ प्रतिमा

भाऊसाहेब वाकचौरे यांची ओळख म्हणजे शांत, संयमी आणि अभ्यासू नेतृत्व. कोणताही गाजावाजा न करता कामावर भर देणारी त्यांची शैली जनतेला भावते. प्रशासकीय अनुभवामुळे सरकारी यंत्रणेकडून कामे कशी करून घ्यावीत, याचे अचूक ज्ञान त्यांना आहे. त्यामुळे अनेक रखडलेल्या योजना मार्गी लागल्याचे चित्र मतदारसंघात दिसून येते.

# जनतेचा विश्वास सार्थ ठरवणार : डॉ. मैथिलीताई तांबे

- भव्य मिरवणुकीने उत्साह पूर्ण वातावरणात पदग्रहण समारंभ संपन्न




**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या मताधिक्याने विजयी झालेल्या नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांच्यासह संगमनेर सेवा समितीच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी आपला पदभार स्वीकारला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज ,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, लालबहादूर शास्त्री, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून ग्रामदैवत लक्ष्मण बाबांचा आशीर्वाद घेऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आपला पदभार स्वीकारला. यावेळी सर्व नगरसेवकांनी महाराष्ट्रीयन फेटे बांधले. ढोल ताशांचा गजर आणि भव्य मिरवणुकीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे ऐतिहासिक नगरपालिकेच्या प्रांगणात आगमन झाले.

प्रियदर्शनी इंदिरा गांधी भवनांमध्ये संगमनेर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. मैथिली सत्यजित तांबे यांनी नगराध्यक्ष खुर्चीवर बसून आपला पदभार स्वीकारला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे सौ दुर्गाताई तांबे, उद्योगपती राजेश मालपाणी ,जर्मनीच्या माजी खासदार क्लोडिया नॉलटे, गिरीश मालपाणी, मनीष मालपाणी, अमर कतारी, रणजितसिंह देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, माजी नगराध्यक्ष दिलीपराव पुंड, विश्वासराव मुर्तडक, नगरसेवक सौ.सीमाताई खटाटे, भारत बोऱ्हाडे, सौ अर्चना दिघे, सौरभ कासार, सौ शोभाताई पवार ,सौ प्राची काशीद ,किशोर पवार, सौ अनुराधा सातपुते, सौ वनिता गाडे, गजेंद्र अभंग, सौ मालती डाके, नितीन अभंग, सौ दिपाली पांचारीया, गणेश गुंजाळ ,अमजद पठाण, श्रीमती विजया गुंजाळ ,शेख शकीला, शेख नूर मोहम्मद ,सरोजना पगडाल, डॉ दानिश, किशोर टोकसे ,सौ प्रियांका शहा ,शैलेश कलंत्री, नंदा गरुडकर मुजीब खान पठाण, नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, उपमुख्य अधिकारी पेखळे, राजेंद्र गुंजाळ यांच्या सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, स्वच्छता, बंधुभाव, एकात्मता ही आपली संस्कृती आहे. आपण कुणाचाही द्वेष करत नाही. राज्यात सर्वाधिक मोठा विजय मिळाला असून या विजयाचे श्रेय संगमनेर मधील सर्व जनतेला आहे. 1991 पासून नगरपालिकेला आदर्श परंपरा सुरू झाली असून यामध्ये डॉ. सुधीर तांबे यांच्यापासून तर सौ दुर्गाताई तांबे यांच्यापर्यंत सर्व नगराध्यक्ष उपनगराअध्यक्ष व नगरसेवकांनी चांगले काम केले .नागरिकांना चांगल्या सुविधा दिल्या या पुढील काळातही नवीन काय करता येईल ते चांगले करा .आपण जे काम करतो ते प्रामाणिकपणे करतो. आत्मविश्वासाने करतो.

संगमनेर शहरातील जनता, आनंदी सुखी होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी केले.

तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर शहर देशात आदर्श बनवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत यामध्ये नागरिकांचा सहभाग सुद्धा महत्त्वाचा आहे. सेवा समितीच्या जाहीरनामा हा जनतेचा जाहीरनामा असून पहिल्या शंभर दिवसांचे काम सुरू केले आहे. गणेश नगर व दिल्ली नाका परिसरामध्ये नगरपालिकेचे क्षेत्रीय कार्यालय उभे केले जाणार असून दरवर्षी नगरसेवकांचा कार्य अहवाल नागरिकांना दिला जाणार आहे याचबरोबर नगरपालिकेत नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा कारवाई करावी लागेल असा इशारा त्यांनी दिला.

राजेश मालपाणी म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहराला सुसंस्कृत परंपरा आहे हे चांगले काम डॉ मैथिलीताई तांबे यांच्या नेतृत्वात पुढे जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी सरोजना पगडाल, प्राची शहा जर्मनीच्या खासदार क्लोडिया नॉलटे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले सूत्रसंचालन सुविधा अरासिद्ध व शोभा हजारे यांनी केले तर प्रमिला अभंग यांनी आभार मानले. यावेळी शहरातील नागरिक महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनतेचा विश्वास सार्थ ठरवणार : डॉ. सौ तांबे

लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरातील नागरिकांना चांगल्या व उच्च दर्जाच्या सुविधा देण्यासाठी सेवा समितीची टीम काम करणार असून 2.0 ही संकल्पना प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू असा शब्द देताना संगमनेरच्या विकासासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. कोणताही भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन शहराला पुढे घेऊन जाण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असा विश्वास डॉ. मैथिलीताई तांबे यांनी व्यक्त केला.

## जन्ममृत्यूचे दाखले घरपोच मिळणार

शहरातील नागरिकांना जन्माचा व मृत्यूचा दाखला हा घरपोच दिला जाईल असे आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले असून शास्तीकर माफीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला आहे या योजनेचा शहरातील नागरिकांनी तातडीने लाभ घ्यावा असे आवाहन करताना विविध नागरिकांच्या घरावरील असलेले आरक्षण हटवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न होईल असेही आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले.

## थोडक्यात बातम्या...




### मनोज जरांगे पाटील यांनी घेतले श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन!

शिर्डी (स. गांवकरी) : मराठा समाजाचे नेते श्री. मनोज जरांगे पाटील यांनी आज पवित्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी मनोभावे प्रार्थना केली. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे मंदिर प्रमुख श्री. विष्णू थोरात यांच्या हस्ते श्री. मनोज जरांगे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर प्रशासनातील अधिकारी, सेवेकरी व भाविक उपस्थित होते. श्री साईबाबांच्या दर्शनामुळे आत्मिक शांती मिळाल्याची भावना यावेळी श्री. मनोज जरांगे यांनी व्यक्त केली. समाजात सद्भावना, समता आणि शांतता नांदावी, अशी प्रार्थना त्यांनी साईबाबांच्या चरणी केली.




### मा. आ. नाना पटोले यांनी घेतले श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन!

शिर्डी (स. गांवकरी) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व आमदार मा. नाना पटोले यांनी पवित्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी मनोभावे प्रार्थना केली. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भिमराज दराडे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मा. नाना पटोले यांचा सत्कार केला. यावेळी संस्थानचे अधिकारी, कर्मचारी व भाविक उपस्थित होते. साईबाबांच्या दर्शनामुळे आत्मिक समाधान मिळाल्याची भावना मा. नाना पटोले यांनी व्यक्त केली. समाजात शांतता, सलोखा आणि सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी बळ मिळावे, अशी प्रार्थना त्यांनी साईबाबांच्या चरणी केली.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५५/२०२५ अकोले दि. ३०/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. एकनाथ किसन सहाणे, रा.सावरगाव पाट**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. चंद्रभागा किसन सहाणे यांचा मृत्यू दि. २४/०३/२०१४** रोजी **मौजे सावरगाव पाट** येथे झाला असुन त्यांच्या **आईच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय सावरगाव पाट**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. एकनाथ किसन सहाणे, रा.सावरगाव पाट**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. चंद्रभागा किसन सहाणे यांचा मृत्यू दि. २४/०३/२०१४** रोजी **मौजे सावरगाव पाट** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय सावरगाव पाट**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालया समोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ३०/१२/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
कामगिरी क्लर्क
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

## गांवकरी समूहाच्यावतीने आ. सत्यजित दादा तांबे यांचा सन्मान

### नगराध्यक्ष मैथीली ताई तांबे यांचा गौरव!



(समर्थ गांवकरी)

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार सत्यजित दादा तांबे यांचा दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी मैथीली ताई तांबे यांची संगमनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.


महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने साईबाबांची मूर्ती, खारीक खोबऱ्याचा हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन हा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आणि संगमनेर तालुका प्रतिनिधी सतीश आहेर उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आमदार सत्यजित दादा तांबे यांच्या सामाजिक व विकासाभिमुख कार्याचा गौरव केला, तर नगराध्यक्ष मैथीली ताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## आळंदीत नृसिंह सरस्वती स्वामी महाराज रथोत्सव हरिनाम गजरात

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे वार्षिकोत्सवातील श्रींची रथोत्सव मिरवणूक श्री विठ्ठल, श्री विठ्ठल नामजयघोषात करीत भाविकांनी श्रींचा रथ हाताने ओढत रथोत्सवात सेवा रुजू केली. यावेळी मार्गावर रांगोळ्यांचे पायघड्या, विद्युत रोषणाईने सजलेला श्रींचा भव्य रथ पुढे फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. पुष्प पाकळ्यांची उधळण करीत श्रींचे दर्शनास भाविकांनी गर्दी करून उत्साहात श्रींचे दर्शन घेतले. श्रीचा पुण्यतिथी महोत्सव आणि अन्न संतर्पण मुक्तद्वार महाप्रसादास भाविकांनी गर्दी केली.



श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज मठ येथून रथोत्सव नगरप्रदक्षिणा करण्यास सुरुवात झाली. प्रदक्षिणा मार्गावरील वाहतूक कोंडी लक्षांत घेऊन आळंदी पोलीस स्टेशन आणि वाहतूक पोलीस विभागाने प्रभावी बंदोबस्त आणि मिरवणुकीचे नियोजन परिश्रम पूर्वक केले. या साठी आळंदी पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, भीमा घुंडरे , पोलीस मित्र योगेश जाधव, आळंदी ग्रामस्थानी रथोत्सवात सेवा रुजू केली. येथील ग्रामस्थ मानकरी श्री रानवडे परिवार यांनी श्रींचे रथोत्सवात नगराखाना सेवा देत नगरप्रदक्षिणा मिरवणुकीत परिश्रम घेतले. श्रींचे पुजारी सुधीर गांधी, सुरेश गांधी, गजानन गांधी व गांधी परिवार, अवधूत महाराज चक्रांकित परिवार यांनी स्वामी महाराज मूळ पीठ येथे श्रींचे रथोत्सवाचे परंपरेने जोरदार स्वागत केले. आळंदीतील नगरप्रदक्षिणा मार्गावर स्वामी भक्तांनी श्रींचे रथोत्सवाचे पुष्पहार, प्रसाद देत मिरवणुकीचे स्वागत करीत श्रींचे रथोत्सवात दर्शन घेत पूजा केली. आळंदी देवस्थान तर्फे रथोत्सवाचे स्वागत करण्यात आले. आवेकर भावे रामचंद्र संस्थान तर्फे विश्वस्त अर्जुन मेदनकर यांनी संस्थान तर्फे स्वागत केले. श्रींचा रथोत्सव हजेरी मारुती मंदिर, मरकळ चौक,पाण्याच्या टाकी मार्गे कॉसमॉस बँक येथून आळंदी पोलिस स्टेशन मार्गे नगरपरिषद चौक मार्गे महाद्वार मार्गे स्वामी महाराज मठ येथे हरिनाम गजरात मार्गस्थ झाला.

रथोत्सवात श्रींचा रथ माऊली मंदिर लगत श्रींचे स्वामींचे मूळपीठ येथे स्वागत त्यानंतर महाद्वार चौकातून माउली मंदिर समोरून भराव रस्ता मार्गे चाकण चौकातून नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचा वैभवी रथोत्सव मठात आला. रथोत्सव मार्गावर श्रींचे स्वागतास रांगोळ्यांचे पायघड्या,पुष्पवर्षाव,स्वागत तसेच भाविकांनी श्रींची आरती करून पुष्पहार अर्पण करीत वार्षिकोत्सवातील रथोत्सवात श्रींचे दर्शन घेतले. यास मार्गावर भाविकांनी गर्दी केली होती. श्रींचा रथोस्तव मूळपीठावर आल्यानंतर ह.भ.प.अवधूत चक्रांकित परिवाराने श्रींची पूजा केली. या ठिकाणी स्वामींचे वास्तव्य होते. पुढे श्रींचा रथोत्सव माउली मंदिर समोर आल्यानंतर श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने श्रींची पूजा झाली. आरती, प्रसाद वाढविण्यात आला. यावेळी पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, देवस्थानचे व्यवस्थापक माउली वीर, श्रीधर सरनाईक, श्रींचे चोपदार सेवक, मानकरी, देवस्थानचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

श्री विठ्ठल श्री विठ्ठल नाम जयघोषात ग्रामस्थांसह भाविकांनी श्रींचा रथ हाताने ओढत रथोत्सवात सेवा रुजू केली. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी उत्साहात करण्यात आली. श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान मठाचे पदाधिकारी, श्रींचे पुजारी माजी नगराध्यक्ष सुरेश गांधी परिवार, सेवक, वारकरी, भाविक, नागरिक उपस्थित होते. श्रींचे रथापुढे परंपरेने येथील ग्रामस्थ पै. सचिन रानवडे परिवाराने नगारखाना सेवा दिली. श्रींचे पुजारी आळंदीचे माजी नगराध्यक्ष सुरेश गांधी सर्व कुटुंबीयांकडे श्रींपूजा,धार्मिक विधी, पोशाख आदी सेवा नित्यनेमाने परंपरेने केली जाते.

# मुख्यमंत्री सडक योजनेतील रस्त्यांचा दर्जा निकृष्ट

### कोट्यवधी खर्चाचा बोजवारा, ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत अकोले तालुक्यातील रस्त्यांची कामे सुरू असली तरी या कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून होणारी ही विकासकामे सुरुवातीपासूनच सदोष पद्धतीने होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. ठेकेदाराकडून नियम व तांत्रिक निकषांना बगल देत कामे सुरू असून, प्रशासनाकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.



मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत अकोले तालुक्यात एकूण नऊ रस्ते कामे प्रस्तावित आहेत. यापैकी काही कामांना अद्याप सुरुवात झालेली नाही, तर सुरू असलेली कामे तालुका हद्दीतील हिवरगाव-पिंपळगाव निपाणी, अंबाई-मुक्ताईनगर, वाघजाळी-ईजिमा २७-अंबड, गर्दनी-बारामती ते रामा ३२ रस्ता, सांगडेवाडी-कुरकुंडी, कोठे-वनकुटे, मोरेवाडी-खैरदरा या मार्गांवर सुरू आहेत. मात्र या सर्व ठिकाणी रस्त्यांचा दर्जा समाधानकारक नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून स्पष्ट होत आहे.

इस्टिमेटमध्ये तरतूद; प्रत्यक्षात कामच नाही! : रस्ते सरळ करण्यासाठी, चढ-उतार कमी करण्यासाठी आणि मजबूत पाया तयार करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद इस्टिमेटमध्ये करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्ष साईटवर आवश्यक खोदकाम, भराव किंवा मातीची दुरुस्ती केलेली दिसून येत नाही. अनेक ठिकाणी रस्त्याचा नैसर्गिक उतार तसाच ठेवून त्यावरच पुढील थर टाकण्यात येत असल्याने भविष्यात रस्ता लवकर खराब होण्याची शक्यता आहे.

GSB, DLC आणि PQC कामांत गंभीर त्रुटी : ग्रॅन्युलर सब बेस (GSB), ड्राय लीन काँक्रीट (DLC) आणि पॅव्हमेंट क्वालिटी काँक्रीट (PQC) ही सर्व कामे तांत्रिक मानकांनुसार न होता अत्यंत निकृष्ट दर्जाने केली जात असल्याचा आरोप आहे. सिमेंटचे प्रमाण कमी, खडी व वाळू निकृष्ट दर्जाची, तसेच योग्य क्युरिंग न केल्यामुळे तयार होणारे मटेरियल कमकुवत बनत आहे. परिणामी अवघ्या दोन महिन्यांतच काही ठिकाणी रस्ते खड्डेमय व धुळमय झाले असून वाहनचालक व ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

खालचा पाया झाकून टाकण्याचा प्रकार : घाईघाईने अंतिम थर म्हणून PQC टाकून त्याखालील निकृष्ट GSB व DLC झाकून टाकण्याचा प्रकार सुरू असल्याचे गंभीर आरोप ग्रामस्थांनी केले आहेत. रस्त्याचा पाया मजबूत न झाल्यास अंतिम थर कितीही चांगला असला तरी तो फार काळ टिकत नाही. तज्ज्ञांच्या मते, अशा पद्धतीने रस्ता तयार झाल्यास एक ते दोन वर्षांतच भेगा पडून रस्ता पूर्णपणे खड्डेमय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तक्रारी असूनही कारवाई नाही : या सर्व बाबी प्रत्यक्ष साईटवर तसेच लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात आल्या आहेत. मात्र त्यावर कोणतीही ठोस सुधारणा न करता उलट घाईघाईने काम पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे. संबंधित ठेकेदारावर राजकीय वरदहस्त असल्यामुळे कोणीही उघडपणे लेखी तक्रार करण्यास धजावत नसल्याची चर्चा परिसरात आहे.

## ५४ कोटींचा खर्च; दहा वर्षांची हमी कागदावरच?

साधारणपणे ५४ कोटी रुपये खर्च करून ४० ते ४४ किलोमीटर लांबीचे हे रस्ते तयार करण्यात येत आहेत. शासनाने दहा वर्षे देखभाल-दुरुस्तीसह रस्ते खराब न होण्याच्या अटीवर ठेकेदाराला कामाचा आदेश दिला आहे. मात्र सध्या सुरू असलेली कामांची स्थिती पाहता हे सिमेंट काँक्रीट रस्ते दोन वर्षेही वापरण्यायोग्य राहतील का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## गुणवत्ता तपासणीची मागणी

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी सदर रस्त्यांच्या कामांचे तात्काळ गुणवत्ता नियंत्रण विभाग, नाशिक यांच्याकडून सखोल कॉलिटी ऑडिट करण्याची मागणी केली आहे. गुणवत्ता तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदारांना बिले अदा करू नयेत, अन्यथा शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी काशिनाथ धनेकर सभागृह, ठाणे येथे अनमोल विद्यामंदिरच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. आयोजित वार्षिक मैत्री मेळाव्यात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयश्रीताई झेरी, डेली झोन, डेव्हिड गायकर, माजी महापालिका कर्मचारी जयश्रीताई डेरी, शरयू अमृतकर (अध्यक्ष, शक्ती फाउंडेशन ऑफ इंडिया, उपवन ठाणे), अरुण आशान (अध्यक्ष, करुणा वृक्ष फाउंडेशन), डॉ. गिरीश छाब्रा (सामाजिक कार्यकर्ते), राजश्री (सामाजिक कार्यकर्त्या) आदी मान्यवर उपस्थित होते.




मार्गदर्शनपर भाषणात नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण व भक्तीचे महत्त्व पटवून देत भावी पिढीसाठी प्रेरणादायी विचार मांडले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थितांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, संगीत व नाट्य सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते व विविध ट्रस्टच्या प्रतिनिधींचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

तसेच, डेली झोन रोटरी क्लब ऑफ ठाणे स्काय तर्फे आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या जयश्रीताई झेरी होत्या. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मैत्रीपूर्ण मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, सेवा व सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाजक्रांतीच्या अग्रदूत : प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे

**देवळा : (समर्थ गांवकरी)**




आदिवासी सेवा समिती, नाशिक संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मानूर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व विशाखा समिती यांच्या समन्वयातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. भामरे म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले केवळ भारतातील पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या समाजक्रांतीच्या खऱ्या अर्थाने अग्रदूत होत्या. महिलांच्या शिक्षणाची मशाल हातात घेऊन त्यांनी अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. ज्या काळात मुलींना शिक्षण देणे पाप समजले जात होते, त्या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शाळा सुरू करून हजारो मुलींच्या जीवनाला नवी दिशा दिली.

अपमान, टीका आणि सामाजिक बहिष्कार सहन करूनही सावित्रीबाईंनी आपले ध्येय सोडले नाही. शिक्षण, समानता आणि स्वाभिमानाचा संदेश त्यांनी आपल्या विचारांतून व कृतीतून समाजाला दिला. सावित्रीबाई फुले यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. ए. सूर्यवंशी यांनी केले. प्रस्तावना प्रा. पी. सी. झनकर यांनी मांडली, तर आभार आयक्यूएसी समन्वयक प्रा. व्ही. के. बोरसे यांनी मानले. कार्यक्रमास परीक्षा अधिकारी प्रा. एस. एल. पवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व्ही. एस. साबळे, शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. आर. एम. पवार यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विखे–जगताप एक्स्प्रेस सुसाट; पाच नगरसेवक बिनविरोध

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर महापालिका निवडणुकीआधीच राजकीय वातावरण तापले असून भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांची परंपरा कायम ठेवत भाजपने महापालिकेतही विजयाचा गुलाल उधळण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीलाच महायुतीचे पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने शहराच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री विखे पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप राष्ट्रवादी महायुतीने शहराच्या राजकारणात ठोस पकड निर्माण केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

प्रभाग क्रमांक सातमधून पुष्पां अनिल बोरुडे, तर प्रभाग क्रमांक सहामधून करण कराळे आणि सोनाबाई शिंदे हे भाजपचे तीन उमेदवार कोणताही सामना न होता विजयी ठरले आहेत. तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट)नेही निवडणुकीत खाते उघडले आहे. प्रभाग क्रमांक ८ मधून कुमार वाकळे आणि प्रभाग क्रमांक १४ मधून प्रकाश भागानगरे हे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. एकूणच, निवडणूकपूर्व टप्प्यातच बिनविरोध विजयानं अहिल्यानगरच्या राजकारणात सत्ता एकहाती जाण्याचे संकेत मिळत आहेत. पालकमंत्री तसेच मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या रणनितीमुळे भाजपचा आत्मविश्वास अधिक बळावला आहे. या निवडणुकीत तब्बल पाच नगरसेवक बिनविरोध निवडून येणे ही घटना राजकीय वर्तुळात 'भूतो न भविषयती' अशी मानली जात आहे. निवडणूकपूर्व टप्प्यातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बिनविरोध यश मिळाल्याने महायुतीच्या संघटनात्मक ताकदीचा अंदाज आला आहे.

# शहरातील डॉक्टरला दीड कोटींचा गंडा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गुंतवणुकीच्या गुंतवणूक केल्यास शंभर टक्के परताव्याचा दावा करणाऱ्या विदेशी कंपनीने अहिल्यानगर शहरातील एका डॉक्टरला १ कोटी ६० लाख ४० हजार रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी केडगाव येथील रहिवासी असलेले ६४ वर्षीय डॉक्टर चंद्रवंदन देवतादिन मिश्रा यांनी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. डॉक्टर मिश्रा यांना एका व्हॉट्सॲप क्रमांकावरून 'गुंतवणूक क्लब' मध्ये सामील होण्यासाठी संदेश आला. त्यानंतर त्यांना एका बनावट उपयोजना (ॲप) द्वारे ट्रेडिंगमध्ये १० ते २० टक्के नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवण्यात आले.




# डोके शाळेत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून नववर्षाचे स्वागत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

निर्मलनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके शाळेत सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून नव वर्षाचे स्वागत आणि संस्थेचे अध्यक्ष श्री.बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेऊन ग्रामस्वच्छता अभियान व खेळांच्या विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपाच्या आरोग्य विभागाचे डॉ. ऋतुजा रणदिवे ह्या उपस्थित होत्या तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.आदिती पाटोळे, डॉ.रजत येवले, परिचारिका सौ.स्वाती कांबळे, तसेच पॅथॉलॉजी डॉ.सना सय्यद,आशासेविका वैशाली धनवडे, चंद्रकला धनवडे, वर्षा महामुनी, योगिता ढवण, अफसाना शेख उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून बोलतांना डॉ. रणदिवे यांनी सांगितले की. मुलांनी सकस आहार घ्यावा. मोबाईल चा वापर जास्त प्रमाणात न करता मैदानात विविध खेळ खेळावेत. तसेच व्यायामा चे महत्व सांगितले स्वच्छते विषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी शाळेजवळील आसपासचा परिसर स्वच्छ करून ग्रामस्वच्छता अभियान राबविन्यात आले. तसेच शालेय विविध क्रिडा स्पर्धा पार पडल्या यामधे लंगडी, खो खो, कबड्डी, वैयक्तिक धावणे, अशा स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे यांनी सर्व नियोजन केले होते. प्रास्ताविक साई विद्यालय मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी केले. सूत्रसंचलन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. कार्यक्रमास सांस्कृतिक विभागप्रमुख ज्योती पवार,मंजू नवगिरे,आशा धामणे, श्री.संज्योत बर्वे, सुजाता कर्डिले, राणी राऊत, सुप्रिया वाळके, भरत जगदाळे, शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रमाची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली.

# किया इंडियाकडून ऑल-न्यू किया सेल्टोस लाँच

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**




किया इंडियाने आज ऑल-न्यू किया सेल्टोसच्या किमतींची घोषणा केली, ज्यासह मिड-एसयूव्ही श्रेणीमध्ये आपले स्थान प्रबळ केले आहे आणि ग्राहकांना त्यांची आवडती एसयूव्ही 10.99* लाख रूपयांपासून (एक्स-शोरूम) सुरू होणाऱ्या किमतीमध्ये खरेदी करण्याची आकर्षक संधी दिली आहे.

अधिकाधिक ग्राहकांसाठी सेकंड-जनरेशन, अधिक मोठी, अधिक आकर्षक आणि अधिक प्रगत एसयूव्ही परवडणारी करत कियाने मापदंड उंचावत या श्रेणीला नव्या उंचीवर नेले आहे. ऑल-न्यू किया सेल्टोसने भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी आणि एसयूव्ही ग्राहकांसाठी सर्वात परिपूर्ण व लक्षवेधक निवड म्हणून आपले स्थान अधिक प्रबळ केले आहे. या एसयूव्हीमध्ये ऐसपैस जागा, आकर्षक नवीन डिझाइन, सुरक्षितता व तंत्रज्ञान आहे, तसेच ही एसयूव्ही आकर्षक दरामध्ये येते.

किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ग्वांगू ली म्हणाले, ऑल-न्यू किया सेल्टोस ब्रँड सेल्टोसच्या प्रबळ उत्क्रांतीची प्रतीक आहे, जेथे ब्रँडने भारतातील कियाच्या प्रवासाला आकार दिला आहे. या नवीन जनरेशनमधून आमचा ऐसपैस जागा, सुरक्षितता, तंत्रज्ञान व एकूण मालकीहक्क अनुभवामधील मानक उंचावत आणि ग्राहकांना अपवादात्मक मूल्य देत मिड-एसयूव्ही श्रेणीला नव्या उंचीवर घेऊन जाण्याचा मनसुबा आहे. हा धोरणात्मक दृष्टिकोन आमच्या स्पर्धात्मकता क्षमतेला अधिक प्रबळ करतो, ब्रँडप्रती ग्राहकांचा आत्मविश्वास अधिक दृढ करतो आणि कियाला भारतातील सर्वात महत्त्वपूर्ण एसयूव्ही श्रेणीमध्ये गती व मार्केट शेअर कायम ठेवण्यास प्रबळपणे स्थित करतो. आपल्या BADASS वारसाशी बांधील राहत ऑल-न्यू सेल्टोसमधून भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली उत्तमरित्या सुसज्ज, फ्यूचर-रेडी एसयूव्ही देण्याप्रती आमची दीर्घकालीन कटिबद्धता दिसून येते.

कियाच्या अनंतपूर प्लांटमध्ये ऑल-न्यू किया सेल्टोसचे उत्पादन सुरू झाले आहे, तसेच किमतीच्या घोषणेसह ग्राहक या एसयूव्हीचे मालक बनण्याच्या जवळ पोहोचले आहे, ज्याला उत्तमरित्या नियोजित उत्पादन व डिलिव्हरी सुविधेचे पाठबळ आहे.

कियाच्या सर्वात प्रीमियम व वैशिष्ट्य-संपन्न व्हेरिएण्ट्सचे भाग जीटीएक्स(ए) व एक्स लाइन(ए) ट्रिम्समध्ये सुधारित प्रगत वैशिष्ट्यांसह खाली देण्यात आलेली सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत.




# भव्य हनुमान कथा (चरित्र) आयोजन

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

वैष्णवी भजनी मंडळ अहिल्यानगरच्या वतीने खाकीदास बाबा मठात काल दि. ३ ते ७ जानेवारी रोजी दुपारी दोन ते सहा वाजेपर्यंत गौडीया वैष्णवाचार्य श्री युगलशरणजी महाराज यांच्या सुमुधर वाणीतून श्री हनुमान कथा ( चरित्र ) वाचनाचे आयोजन केले आहे. या कथेदरम्यान प्रभू श्रीरामांचे परमभक्त हनुमानजी यांच्या जीवनातील शौर्य,भक्ती, सेवा व निष्ठेचे प्रेरणादायी प्रसंग कथारूपाने सादर केले जाणार आहेत. या कार्यक्रमात भजन,कीर्तन व कथासमाप्तीला महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

# एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स लाँच

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदात्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या सहकार्याने एअरटेल डिजिटल टीव्हीवर उपलब्ध असलेल्या विशेष मूल्यवर्धित सेवेअंतर्गत "एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स" च्या लाँचची घोषणा केली. हे नवीन चॅनेल कार्टून नेटवर्कवरील काही सर्वात आयकॉनिक ॲनिमेटेड फ्रँचायझी एकत्र आणते, ज्यामुळे कालातीत कथा सांगण्याचा आणि संपूर्ण कुटुंबासाठी योग्य मनोरंजनाचा एक समर्पित मंच उपलब्ध होतो. एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स टॉम अँड जेरी, द फ्लिंटस्टोन्स, लूनी ट्यून्स, स्कूबी डू, जॉनी ब्रावो तसेच इतर अनेक कालातीत आवडीचे कार्यक्रम पुन्हा प्रेक्षकांसमोर आणते. या अत्यंत लोकप्रिय आणि कालातीत शो पाहत मोठे झालेल्या प्रेक्षकांसाठी विशेषतः छाननी करून तयार केलेले करण्यात आलेले हे चॅनेल कुटुंबांना नव्या पिढीसमोर ९० आणि २००० च्या दशकातील सांस्कृतिक ओळखीचा भाग बनलेल्या ॲनिमेटेड कथा ओळख करून देण्याची संधी देईल, ज्या आजही तितक्याच प्रभावीपणे प्रेक्षकांशी जोडल्या जात आहेत. लाँचबाबत प्रतिक्रिया देताना, एअरटेलचे डीटीएच–बिझनेस हेड पुष्पिंदर सिंग गुजराल म्हणाले, "एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स आमच्या पोर्टफोलिओमध्ये एक वेगळे आणि खास मनोरंजनाचे स्तर जोडते आणि आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून असलेल्या आयकॉनिक कथा व पात्रांशी पुन्हा जोडण्याची संधी ग्राहकांना देते. हे चॅनेल आमच्या सर्व डीटीएच आणि आयपीटीव्ही ग्राहकांसाठी उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे आणि भविष्यात अशाच प्रकारचे अधिक निवडक अनुभव आमच्या ग्राहकांसाठी घेऊन येण्यास आम्ही उत्सुक आहोत." दरमहा रुपये 59 किमतीत उपलब्ध असलेले आणि इंग्रजी तसेच हिंदी भाषेत चॅनेल क्रमांक 445 वर प्रसारित होणारे हे जाहिरातमुक्त चॅनेल Xstream व IPTV सारख्या कनेक्टेड सेट-टॉप बॉक्सेससह नॉन-कनेक्टेड HD आणि SD बॉक्सेसवरही उपलब्ध आहे.







# सारडा महाविद्यालयात साडी व टाय डे साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात स्नेहसंमेलनानिमित्त साडी व टाय डे चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थिनींनी विविध प्रकारच्या साड्या परिधान केल्या तर विद्यार्थ्यांनी टाय डे साजरा केला. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ माहेश्वरी गावित म्हणाल्या भारतीय संस्कृतीची प्रतीक साडी व पाश्चिमात्य संस्कृतीचा टाय यांचा सुरेख संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी नाविन्याची कास धरताना आपल्या परंपरांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी देखील यात सहभाग नोंदविला. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर कनिष्ठ महाविद्यालय कमिटी चेअरमन डॉ पारस कोठारी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# संतूरने २८५० कोटी विक्रीचा टप्पा गाठला

## भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला

**(समर्थ गांवकरी)**

चंदन आणि हळद या खास गुणधर्मांमुळे ओळखला जाणारा संतूर 1985 मध्ये बंगळुरूमध्ये मर्यादित स्वरूपात सुरू झाला. त्यानंतर 1986 मध्ये तो संपूर्ण देशभरात उपलब्ध झाला. गेल्या 12 महिन्यांतील कंपनीच्या विक्रीच्या (INDAS) आकडेवारीनुसार संतूरने वैयक्तिक स्वच्छतेच्या उत्पादनांमध्ये 2,850 कोटी रुपयांची विक्री केली असून भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला आहे.




संतूरने सर्वसामान्य भारतीय महिलांसाठी "तरुण दिसणारी त्वचा" हा सहज समजणारा संदेश दिला. हा संदेश 'संतूर मॉम' या जाहिरातीद्वारे लोकांपर्यंत पोहोचवला गेला, सातत्याने वापरला गेला. परंतु काळानुसार महिलांच्या बदलत्या इच्छा-आकांक्षा आणि त्यांच्या विविध भूमिका दाखवण्यासाठी या संदेशाचे सादरीकरण बदलत गेले, ज्यामुळे ग्राहकांशी संतूरचं नाते अधिक घट्ट झाले. गेल्या अनेक वर्षांत संतूरने आपल्या उत्पादनाची गुणवत्ता आणि पॅकेजिंग सुधारण्यासाठी मेहनत केली आणि संतूरला त्याच्या चमकदार नारिंगी रंगासोबत जोडून एक वेगळी ओळख निर्माण केली. मजबूत कामकाज आणि महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये अव्वल स्थान मिळवण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे संतूरचा हा यशस्वी प्रवास शक्य झाला. या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना विनीत अग्रवाल, सीईओ, विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंग आणि मॅनेजिंग डायरेक्टर, विप्रो एंटरप्रायझेस म्हणाले," भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड होणे हे आमच्यासाठी विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगमध्ये एक अभिमानाची गोष्ट आहे. संतूरचा प्रवास ग्राहकांना समजून घेणे, नियमीत काम करणे आणि सातत्याने मूल्य निर्माण करणे या विश्वासावर आधारित आहे. ग्राहकांना उत्तम गुणवत्ता देण्यासाठी आम्ही सातत्याने मेहनत घेतली आहे, उत्पादनात सातत्याने सुधारणा केली आहे. मग तो सुगंध असो, उत्कृष्ट अनुभव असो किंवा कठीण पाण्यात कामगिरी असो. यासोबत आकर्षक जाहिरातींनीही ब्रँडच्या यशाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे." नीरज खत्री, चीफ एक्झिक्युटिव्ह, विप्रो कन्झ्युमर केअर म्हणाले,"हा टप्पा आमच्यासाठी खूप अभिमानाचा आहे. आमच्या कारखान्यांतील टीम, फ्रंटलाईन कर्मचारी आणि विविध भागांतील व्यवसायिक टीम्स यांनी खूप मेहनत घेतली आहे. संतूरला आघाडीवर नेण्याचा त्यांचा ठाम विश्वास, कठोर परिश्रम आणि उच्च गुणवत्ता व कार्यक्षमतेप्रती निष्ठा यामुळे हे यश मिळाले. आमच्या वितरक आणि भागीदारांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि सहकार्याबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत ज्यांच्या मदतीशिवाय हा प्रवास शक्य झाला नसता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळेच ग्राहकांचा विश्वास आणि बाजारातील नेतृत्व टिकवण्यात मदत झाली आहे." 1986 मध्ये ब्रँडची स्पष्ट ओळख तयार झाल्यामुळे संतूरने स्वतःची छाप निर्माण केली आणि पहिल्या दशकात केवळ 60 कोटींची विक्री केली. 1990 च्या शेवटी, विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगने जास्त वाढीची संधी असलेल्या राज्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी धोरणात्मक बदल केला, एकावेळी एका राज्यावर काम केले. आंध्र प्रदेशपासून (नंतर आंध्र प्रदेश आणि तेलंगणा) सुरुवात करत, संतूरने महाराष्ट्र, कर्नाटका आणि गुजरातमध्येही मोठी वाढ केली आणि या यशस्वी वाटचालीमुळे 2009 पर्यंत संतूर दक्षिण आणि पश्चिम भारतातील क्रमांक एक साबण ब्रँड ठरला.

या धोरणात संतूरने विस्तारापेक्षा खोलवर प्रभाव निर्माण करण्यावर भर दिला, म्हणजे गुंतवणूक आणि ब्रँडची उपस्थिती ठराविक बाजारपेठांमध्ये अधिक मजबूत करण्यात आली. 2018 पर्यंत संतूरने 2,000 कोटी विक्रीचा टप्पा गाठला आणि मूल्याच्या दृष्टीने लक्सला मागे टाकून भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा साबण ब्रँड बनला.

